**दिनांक : 7/4/24**

**विषय : सोसायटीच्या पुनर्निर्माण प्रक्रियेत काही महत्वाच्या बाबींवर चर्चा करण्या संबंधी पंच समिती ची तातडीची सभा.**

दिनांक 5/4/24 रोजी पंच समिती ची मीटिंग खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्या करिता आपल्या समाज मंदिरात रात्री 8.30 ला घेण्यात आली. ह्या मीटिंग ला समिती चे दोन सदस्य पुण्या बाहेर असल्याने उपस्थित राहू शकले नाही. मीटिंग च्या अध्यक्ष स्थानी श्री विजय सावंत होते.

1. सोसायटीत नंतर फ्लॅट्स खरेदी केलेले तसेच गिफ्ट स्वरूपात फ्लॅट्स मिळणारे 18 सभासदांच्या फाईल्स, ज्या कलेक्टर ऑफिस मधे प्रलंबित आहे, त्यावर खुलासा.

2. बिल्डर ने मागल्या महिन्यात दाखविलेल्या नवीन फ्लॅट्स च्या डिझाईन वर सभासदांच्या प्रतिक्रियांच्या अनुषंगाने आपले सल्लागार श्री हर्षल कवडिकर यांनी त्यांच्या कडून बिल्डर ला पाठविण्यात येणाऱ्या पत्रा चा ड्राफ्ट पंच समिती च्या मान्यते साठी पाठवला होता त्यावर चर्चा करून निर्णय घेणे.

सुरवातीला ला सचिव श्री पटवर्धन यांनी शरयू इमारतीतल्या दोन सदनिकांचे नंबर, श्री शिरीष शाह आणि श्री विनायक पटवर्धन यांच्या मालकीच्या, एकच असल्याने त्या दोन्ही फाईल्स कलेक्टर ऑफिस मधे (18 फाईल्स पेकी) अडकल्या असल्याचे सांगितले. ही चूक सुधारण्याच्या दृष्टी ने पटवर्धन आणि शाह ह्या दोघांनी कॉर्पोरेशन ऑफिस ला जाऊन सदनिकांच्या नंबर मधे आवश्यक सुधारणा करण्याची सुरुवात केल्या चे ही सांगितले. बिल्डर कडून असे ही समजले कि ह्या 18 सभासदांनपेकी, ज्यांनी सदनिका विकल्या अगर गिफ्ट केल्या, त्यातले बरेच सभासदांची नावं पूर्वी कलेक्टर ऑफिस मधे असलेल्या मूळ सभासदांच्या यादीत नाहीत आणि त्या मुळे काही समस्या उद्भवू शकतात. ह्यात सभासद 1978-79 मधे सोसायटी चा सदस्य झाला असला तरी त्या बद्धल ची सरकारी मान्यता त्या वेळेस घेण्यात आली नव्हती आणि म्हणून असल्या केसेज ला सेकंड सेल म्हणून ही धरण्यात येऊ शकते. बिल्डर ह्या वर तोडगा काढण्याची खटपट करीत आहे. पण ह्या मुळे ही सगळी प्रक्रिया वेळ खाऊ होत आहे. समाज मंदिरा चा कर्मशिअल उपयोग आणि 100 / 102 सदनिकां चे प्रकरण ही resolve करण्याच्या दृष्टी ने बिल्डर कडून प्रयत्न केले जात आहेत. जो पर्यंत हे विषय तडीस जात नाहीत तवर आपल्या जागे च्या मालकी च्या वर्गीकरण बदला चा विषय ही पेंडींग राहील.

श्री कवडिकर यांच्या पत्राच्या ड्राफ्ट वर चर्चे अंती असे ठरले कि जवर कलेक्टर ऑफिस मधे प्रलंबित विषयांचे निराकरण होत नाही तवर बिल्डर कडे फ्लॅट्स च्या डिझाईन संबंधी बाबींवर चर्चा करू नये आणि म्हणून श्री कवडिकरांना सध्या बिल्डर ला पत्र पाठविण्यापासून थांबवावे. ह्या काळात बिल्डर डुप्लेक्स इमारतींच्या डिझाईन डुप्लेक्स धारकांना दाखवू शकतो म्हणजे ह्या फ्रंट वर काम थांबले आहे असे ही बिल्डर ला वाटायला नको. श्री नेवाळकर यांनी ह्या संबंधात श्री कवडिकरांशी बोलावे असे ही ठरविण्यात आले.

समिती सदस्यांनी असे ही मनोगत व्यक्त केले कि जर गरज पडली तर पत्रकार नगर च्या काही सभासदांचे एक प्रतिनिधी मंडळ पुण्या च्या कलेक्टर साहेबांना भेटण्यास पाठवावे जे आपल्या सोसायटी च्या पुनर्निर्माण संबंधी केस त्यांच्या समोर व्यवस्थित मांडू शकेल ज्या मुळे बिल्डर च्या प्रयत्नांना बळ मिळेल.
शेवटी सर्वांचे आभार मानून अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**